म.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे ला.प्र.वि. पहिली खबर क्र. ३९ वर्ष २०१८ दिनांक १४/०८/२०१८
   State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. (सुधारित) २०१८ कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार तारीख पासून १३/०८/१८ वेळ १५.०० तारीख पर्यंत १३/०८/१८ वेळ [illegible] वा.
   Occurence of offence : Day Date from Time Date to Time

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची तारीख १३/०८/१८ वेळ ............
   Information received at P. S. Date Time

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०८/१८ तारीख १४/०८/१८ वेळ ०२.४१
   General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी लेखी / तोंडी Written / Oral ............

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव रामनाथ बिल्डर, ऑप नं. ४.७, मोतीशा लेन बिल्डिंग, २४, कुलाबा, कास्वे, शहीद भगतसिंग रोड, मुंबई ३९ ठिकाणाचे नंबर गल्ली रस्त्याचे नाव
   Address of Occurence Name No. if any Ward Name of road

   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ............ गाव ............ पोस्ट ............ तालुका............ जिल्हा ............राज्य ............
   Nearest Adentifiable Place Village Post Taluka Dist. State

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ............ तालुका............ जिल्हा ............राज्य ............
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address
   (a) नाव Name श्री साबिर अली शेख (b) वडिलाचे / पतीचे नाव इस्लाम शेख
   Father's / Husbands Name
   (c) जन्मतारीख व वय ५७ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ............
   Date of Birth & Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ............ दिल्याचा दिनांक ............ दिल्याचे ठिकाण ............ (f) व्यवसाय ............
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion मुस्लिम जात Caste जनजात Sub-Caste
   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. रुम नं. ५, घर/नाव नंबर लालमल कम्पाउंड, फोन/मो. नंबर नवा नगर, ५ वा रस्ता, पॅन नं. ............ ओटर्स नं............
   Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
   डॉकयार्ड रोड, मुंबई-१०
   रस्त्याचे नाव ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ............ गाव ............ पोस्ट ............ पो.स्टे ............
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ............ जिल्हा ............ राज्य ............ सध्याचा पत्ता ............
   Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   समीर मधुकर वाडेकर वय ४४ वर्षे, धंदा-नोकरी (प्रभारी अभियंता) इलेक्ट्रिक हाऊस, ग्राहक सेवा केंद्र, 'अ' वार्ड, कुलाबा, मुंबई; राह. ९, प्रकाश निवास (त्रिमुर्ती निवास), जे. एम रोड, कुर्ला नगर, भांडुप (प.), मुंबई-७८

फिर्यादीचे नाव साबीर अली इंतजाम अली शेख वय ५० वर्षे यांची स्वतंत्र पानावर टंकलिखित करण्यात आलेली फिर्याद हीच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(आर.डी. ठेंगले)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई.

14/8/2018

**फिर्याद** दिनांक १४/०८/२०१८

श्री साबीरअली इन्तेजामअली शेख, वय ५७ वर्षे. धंदा– वायरमन(कॉन्ट्रॅक्टर), रा.ठी. शॉप नं.५, दालमिल कंम्पाऊड, नवा नगर, ५१ सी, डॉर्कयार्ड रोड, माझगांव, मुंबई–१० मोबाईल नं ९३२२८२४४९७, ८७७९७७३५६३

——— ० ———

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियांसमवेत जन्मापासून रहात आहे. मी व्यवसायाने इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर आहे. मी सदर काम हे सन २००६ पासुन करत आहे. माझ्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील परवाना आहे.

माझ्या कामाचे स्वरूप मी खाजगी सोसायटीचे, घराचे वायरींगचे काम करून घेणे, तसेच ज्या ठिकाणी मीटर लागणार आहेत, तेथील प्लास्टरींग व इतर सिव्हील कामे करतो. त्यानंतर माझे काम पुर्ण झाल्याबाबत बीईएसटीकडे माझे सही शिक्यानिशी रिपोर्ट सादर करतो.

मला १५८/१६०, नगिना मंजिल, मोहम्मद उमर कोहली मार्ग, निशानपाडा, खडक चिंचबंदर, मुं.न. ९ येथील सोसायटीचे इलेक्ट्रिक वायरींगचे तसेच इलेक्ट्रिक मीटर बोर्ड बदलण्याचे काम मिळाले होते. त्याप्रमाणे मी नगिना मंजिल येथील सोसायटीच्या रहिवाश्यांच्या नावे डिव्हिजन इंजिनिअर, आय.एफ. डिपार्टमेंट, कस्टमर केअर, 'बी' वॉर्ड, इलेक्ट्रिक हाऊस, कुलाबा येथे दिनांक ०२/०७/२०१८ रोजी स्वतः पत्र देवून त्याची पोचपावती घेतली आहे. सोसायटीच्या पत्रानुसार कुलाबा कार्यालयातील सहाय्यक अभियंता, कस्टमर केअर (अ), वॉर्ड यांच्यामार्फतीने दिनांक १७/०७/२०१८ रोजी इलेक्ट्रिक मीटर बोर्डचे व वायरींगचे काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करण्याबातचे पत्र सोसायटीला दिले होते. त्यानंतर दिनांक ०३/०८/२०१८ रोजी बीईएसटीचे अधिकारी श्री बांदेकर व श्री संजय वाकचौरे हे त्यांचे सोबत दोन कामगारांना घेवुन मीटर बोर्डचे काम त्यांनी करून दिले. त्यांनतर दिनांक ०९/०८/२०१८ रोजी सायंकाळी ०५.३० वाजताच्या सुमारास बीईएसटीचे अधिकारी श्री वाडेकर यांनी मला माझ्या मोबाईलवर संपर्क करून मीटर बोर्डचे करून दिलेल्या कामाबाबत विचारणा करून त्या बदल्यात पैशाची मागणी केली होती. त्यावेळी मी त्यांना किती पैसे द्यावे लागतील याबाबत विचारले असता त्यांनी प्रत्येक मीटर मागे रू.३५०/– याप्रमाणे ६५ मीटरचे एकूण रु. २२,७५०/– इतक्या रकमेची मागणी केली होती. त्यानंतर परत कमी करुन ती प्रत्येक मीटरमागे रु. २५०/– प्रमाणे एकुण रु.१६,२५०/– ची लाचेची मागणी करीत होते याची मला खात्री झाल्याने व त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी त्याच्याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागास तक्रार करण्याचे निश्चित केले व दिनांक १३/०८/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली होती.

त्यावेळी पो.नि. ठेंगले यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात येणाऱ्या सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मी सापळा कारवाई करण्यास संमती दिल्यानंतर काही वेळाने पो.नि.ठेंगले यांनी सदरवेळी स.पो.आ चिंचकर यांची पर्यवेक्षक अधिकारी असल्याबाबत ओळख करून दिली. त्याचवेळी सदर कक्षात दोन अनोळखी इसम हजर झाले. तेव्हा सदरच्या दोन अनोळखी इसमांनी त्यांचा परिचय दिली की, १) श्री. रविंद्र यशवंत बागडे, परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी, घाटकोपर यांचे कार्यालय टोपीवाला कम्पांउड, मुलुंड पश्चिम मुंबई ८० २) श्री. संदीप शंकर मयेकर, परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी, मालाड यांचे कार्यालय तहसीलदार बिल्डींग ५ वा मजला, बोरीवली पश्चिम मुंबई ९२ असा परिचय करुन दिल्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी त्यांचा स्वतःचा परिचय करुन दिला. त्यानंतर पो.नि ठेंगले यांनी दोन्ही पंचाना सांगितले की, एका लोकसेवकाविरुध्द लाच मागत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक लाच मागतात किंवा कसे? याबाबत खात्री करुन सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी यापुर्वी दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम केले नसल्याबाबत खात्री करुन दोन्ही पंचाची सापळा कारवाईसाठी संमती घेतली. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी माझा दोन्ही पंचाना परिचय करुन दिला व त्यानंतर पो.नि. ठेंगले यांनी माझा हिंदीतुन टंकलिखित केलेला अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचानी माझा हिंदीतील अर्ज वाचुन पाहिला त्यानंतर त्यावर दोन्ही पंचानी व समक्ष म्हणुन पो.नि.ठेंगले यांनी सहया केल्या

त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी लोकसेवक वाडेकर हे माझे कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत पंचासमक्ष लाच पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याकरीता माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य एका सोनी कंपनीच्या डिजिटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये घेण्यात आले. तसेच सदर पडताळणी कारवाई करताना घेण्यात यावयाच्या दक्षतेबाबत पो.नि ठेंगले यांनी मला व पंचाना सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी पडताळणी कारवाईसाठी आवश्यक ते सर्व साहित्य शासकिय वाहनात घेवून मी, पो.नि.ठेंगले, स.पो.आ.चिंचकर, दोन्ही पंच, सापळा पथक असे सर्व मिळून लाचलुचपत प्रतिबंध विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयाच्या आवारात आलो. तेथे उभ्या असलेल्या सरकारी वाहन चालकाची व आमची ओळख करून दिली. त्यांनंतर पो.नि.ठेंगले,स.पो.आ चिंचकर व सापळा पथक असे कार्यालयातनु शासकिय वाहनाने वरळी नाका, हाजीअली, सीएसटी मार्गे इलेक्ट्रिक हाऊस, ग्राहक सेवा केंद्र, 'अे' वॉर्ड, कुलाबा, मुंबई येथील कार्यालयाच्या जवळच रस्त्याच्या कडेला थांबलो. पो.नि ठेंगले यांनी मला लोकसेवक वाडेकर हे कार्यालयात आहेत किंवा कसे? यांबाबत खात्री करून घेण्याकरीता फोन करण्यास सांगितले त्याप्रमाणे मी माझ्या मोबाईल फोनवरून लोकसेवक वाडेकर यांना फोन केला असता त्यांनी मला कार्यालयाच्या जवळच असलेल्या रामनाथ स्नॅक्स (कामत हॉटेल) मध्ये येण्यास सांगितले सदर संभाषणाबाबत मी पो.नि.ठेंगले यांना सांगितले.

त्याप्रमाणे मी लोकसेवकास भेटावयास जाण्या अगोदर पो.नि ठेंगले यांनी सोबत आणलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्ड चालु करून माझ्या शर्टाच्या आतिल बनियनला

समक्ष 14/8/18

14/8/2018

लावला. पो.नि. ठेंगले यांनी माझ्यासोबत पंच श्री बागडे यांना योग्य त्या सुचना देवुन पाठविले. त्यानंतर मी व पंच बागडे असे लोकसेवकास भेटण्यास त्याने सांगितलेल्या रामनाथ स्नॅक्स या हॉटेलमध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारण्याबाबत अस्पष्ट मागणी केली. त्यामुळे मी व पंच पुन्हा पोलीस वाहनाजवळ आलो. त्यावेळी पोनि ठेंगले यांनी मला लावण्यात आलेला व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला व सदर रेकॉर्डरमधील संभाषण रेकॉर्डरच्या स्पिकर चालु करून ऐकले. सदरवेळी संभाषणात लोकसेवकाने माझ्याकडे लाचेच्या पैशाची अस्पष्ट मागणी केल्याचे दिसून आले.

त्यानंतर पो.नि. ठेंगले यांनी पुन्हा मला व्हॉईस रेकॉर्डर चालु करून लोकसेवकास फोन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझ्या मोबाईलचा स्पिकर चालु करून लोकसेवकास फोन केला. त्यावेळी लोकसेवकास मी वारंवार फोन करत असल्याने त्याचा लोकसेवक वाडेकर याला संशय आला असावा म्हणुन तो मला अस्पष्ट स्वरुपात '' आप को आप को..जैसा लगता है वैसा दे दो..ठिक है.. सोच लो प्यार मोहबत की बाते है.... समजके...'' लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवकाने मला लाचेची ठरावीक रक्कमदेखील सांगितली नाही परंतु मनाने समजुन काहीतरी रक्कम दयावी या उददेशाने उशीरा पर्यंत कार्यालयात हजर राहुन माझे प्रत्येक फोन कॉलला प्रतिसाद देत होता. माझेशी केलेल्या सर्व संभाषणात त्याने कधीही त्याला पैसे नको पाहिजे असे बोलला नाही.

लोकसेवकाने माझ्याशी केलेल्या वरील संभाषणाप्रमाणे सदरवेळी माझ्याकडे असलेले रोख ८ हजार रूपये लाच लोकसेवकास देण्यास तयार झालो. लोकसेवक वाडेकर यांची माझेकडे माझे कामासाठी लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने आज लाचेच्या सापळयाचे आयोजन केले. तत्पुर्वी लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याबाबतची कारवाई करावी लागेल असे पो.नि. ठेंगले यांनी सांगितले.

त्यानंतर पो.नि.ठेंगले यांचे सुचनेप्रमाणे मी माझे जवळील सर्व साहित्य शासकिय वाहनातील सिटवर काढून अंगझडती घेतली. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाईत वापरण्यात येणारी अॅन्थ्रासिन पावडरचा उपयोग, गुणधर्म याबाबत सविस्तर माहिती देवून त्याबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. त्यानंतर माझे जवळ असलेल्या रू.५००/— दराच्या १६ चलनी नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर घेवुन नंतर त्या नोटांना पोलीस कर्मचारी वळतकर यांनी अॅन्थ्रसिन पावडर लावली. सदर अॅन्थ्रसिन पावडर लावलेल्या नोटा वळतकर यांनी माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या व पोलीस कर्मचारी वळतकर हे निघुन गेले.

पो.नि. ठेंगले यांनी मला, दोन्ही पंचाना व सोबतच्या पथकाला सापळा कारवाई बाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन देवून पंच रविंद्र बागडे यांच्यासह मला लोकसेवक वाडेकर यांना लाचेची रक्कम रु. ८,०००/— देण्याकरीता रवाना केले. तेव्हा आमच्या आजुबाजुस पो.नि.ठेंगले, पंच क्र. २ व इतर अधिकारी, कर्मचारी उभे होते. मी रामनाथ स्नॅक्स (हॉटेल कामत) येथे पोहचलो असता माझे अगोदरच लोकसेवक वाडेकर त्या ठिकाणी हजर होते. तेथे

त्यावेळी पो.नि. ठेंगले यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात येणाऱ्या सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मी सापळा कारवाई करण्यास संमती दिल्यानंतर काही वेळाने पो.नि.ठेंगले यांनी सदरवेळी. स.पो.आ चिंचकर यांची पर्यवेक्षक अधिकारी असल्याबाबत ओळख करून दिली. त्याचवेळी सदर कक्षात दोन अनोळखी इसम हजर झाले. तेव्हा सदरच्या दोन अनोळखी इसमांनी त्यांचा परिचय दिली की, १) श्री. रविंद्र यशवंत बागडे, परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी, घाटकोपर यांचे कार्यालय टोपीवाला कम्पांउड, मुलुंड पश्चिम मुंबई ८० २) श्री. संदीप शंकर मयेकर, परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी, मालाड यांचे कार्यालय तहसीलदार बिल्डींग ५ वा मजला, बोरीवली पश्चिम मुंबई ९२ असा परिचय करुन दिल्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी त्यांचा स्वत:चा परिचय करुन दिला. त्यानंतर पो.नि ठेंगले यांनी दोन्ही पंचाना सांगितले की, एका लोकसेवकाविरुध्द लाच मागत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक लाच मागतात किंवा कसे? याबाबत खात्री करुन सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी यापुर्वी दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम केले नसल्याबाबत खात्री करुन दोन्ही पंचाची सापळा कारवाईसाठी संमती घेतली. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी माझा दोन्ही पंचाना परिचय करुन दिला व त्यानंतर पो.नि. ठेंगले यांनी माझा हिंदीतुन टंकलिखित केलेला अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचानी माझा हिंदीतील अर्ज वाचुन पाहिला त्यानंतर त्यावर दोन्ही पंचानी व समक्ष म्हणुन पो.नि.ठेंगले यांनी सहया केल्या

त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी लोकसेवक वाडेकर हे माझे कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत पंचासमक्ष लाच पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याकरीता माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य एका सोनी कंपनीच्या डिजिटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये घेण्यात आले. तसेच सदर पडताळणी कारवाई करताना घेण्यात यावयाच्या दक्षतेबाबत पो.नि ठेंगले यांनी मला व पंचाना सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी पडताळणी कारवाईसाठी आवश्यक ते सर्व साहित्य शासकिय वाहनात घेवून मी, पो.नि.ठेंगले, स.पो.आ.चिंचकर, दोन्ही पंच, सापळा पथक असे सर्व मिळून लाचलुचपत प्रतिबंध विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयाच्या आवारात आलो. तेथे उभ्या असलेल्या सरकारी वाहन चालकाची व आमची ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि.ठेंगले,स.पो.आ चिंचकर व सापळा पथक असे कार्यालयातनु शासकिय वाहनाने वरळी नाका, हाजीअली, सीएसटी मार्गे इलेक्ट्रिक हाऊस, ग्राहक सेवा केंद्र, 'अे' वॉर्ड, कुलाबा, मुंबई येथील कार्यालयाच्या जवळच रस्त्याच्या कडेला थांबलो. पो.नि ठेंगले यांनी मला लोकसेवक वाडेकर हे कार्यालयात आहेत किंवा कसे? यांबाबत खात्री करून घेण्याकरीता फोन करण्यास सांगितले त्याप्रमाणे मी माझ्या मोबाईल फोनवरून लोकसेवक वाडेकर यांना फोन केला असता त्यांनी मला कार्यालयाच्या जवळच असलेल्या रामनाथ स्नॅक्स (कामत हॉटेल) मध्ये येण्यास सांगितले सदर संभाषणाबाबत मी पो.नि.ठेंगले यांना सांगितले.

त्याप्रमाणे मी लोकसेवकास भेटावयास जाण्या अगोदर पो.नि ठेंगले यांनी सोबत आणलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्ड चालु करून माझ्या शर्टाच्या आतिल बनियनला

समक्ष 14/8/18

14/8/2018

लावला. पो.नि. ठेंगले यांनी माझ्यासोबत पंच श्री बागडे यांना योग्य त्या सुचना देवुन पाठविले. त्यानंतर मी व पंच बागडे असे लोकसेवकास भेटण्यास त्याने सांगितलेल्या रामनाथ स्नॅक्स या हॉटेलमध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारण्याबाबत अस्पष्ट मागणी केली. त्यामुळे मी व पंच पुन्हा पोलीस वाहनाजवळ आलो. त्यावेळी पोनि ठेंगले यांनी मला लावण्यात आलेला व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला व सदर रेकॉर्डरमधील संभाषण रेकॉर्डरच्या स्पिकर चालु करून ऐकले. सदरवेळी संभाषणात लोकसेवकाने माझ्याकडे लाचेच्या पैशाची अस्पष्ट मागणी केल्याचे दिसून आले.

त्यानंतर पो.नि. ठेंगले यांनी पुन्हा मला व्हॉईस रेकॉर्डर चालु करून लोकसेवकास फोन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझ्या मोबाईलचा स्पिकर चालु करून लोकसेवकास फोन केला. त्यावेळी लोकसेवकास मी वारंवार फोन करत असल्याने त्याचा लोकसेवक वाडेकर याला संशय आला असावा म्हणुन तो मला अस्पष्ट स्वरुपात '' आप को आप को..जैसा लगता है वैसा दे दो..ठिक है.. सोच लो प्यार मोहबत की बाते है.... समजके...'' लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवकाने मला लाचेची ठरावीक रक्कमदेखील सांगितली नाही परंतु मनाने समजुन काहीतरी रक्कम दयावी या उददेशाने उशीरा पर्यंत कार्यालयात हजर राहुन माझे प्रत्येक फोन कॉलला प्रतिसाद देत होता. माझेशी केलेल्या सर्व संभाषणात त्याने कधीही त्याला पैसे नको पाहिजे असे बोलला नाही.

लोकसेवकाने माझ्याशी केलेल्या वरील संभाषणाप्रमाणे सदरवेळी माझ्याकडे असलेले रोख ८ हजार रूपये लाच लोकसेवकास देण्यास तयार झालो. लोकसेवक वाडेकर यांची माझेकडे माझे कामासाठी लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने आज लाचेच्या सापळयाचे आयोजन केले. तत्पुर्वी लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याबाबतची कारवाई करावी लागेल असे पो.नि. ठेंगले यांनी सांगितले.

त्यानंतर पो.नि.ठेंगले यांचे सुचनेप्रमाणे मी माझे जवळील सर्व साहित्य शासकिय वाहनातील सिटवर काढून अंगझडती घेतली. त्यानंतर पो.नि.ठेंगले यांनी मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाईत वापरण्यात येणारी अॅन्थ्रासिन पावडरचा उपयोग, गुणधर्म याबाबत सविस्तर माहिती देवून त्याबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. त्यानंतर माझे जवळ असलेल्या रू.५००/— दराच्या १६ चलनी नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर घेवुन नंतर त्या नोटांना पोलीस कर्मचारी वळतकर यांनी अॅन्थ्रसिन पावडर लावली. सदर अॅन्थ्रसिन पावडर लावलेल्या नोटा वळतकर यांनी माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या व पोलीस कर्मचारी वळतकर हे निघुन गेले.

पो.नि. ठेंगले यांनी मला, दोन्ही पंचाना व सोबतच्या पथकाला सापळा कारवाई बाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन देवून पंच रविंद्र बागडे यांच्यासह मला लोकसेवक वाडेकर यांना लाचेची रक्कम रु. ८,०००/— देण्याकरीता रवाना केले. तेव्हा आमच्या आजुबाजुस पो.नि.ठेंगले, पंच क्र. २ व इतर अधिकारी, कर्मचारी उभे होते. मी रामनाथ स्नॅक्स (हॉटेल कामत) येथे पोहचलो असता माझे अगोदरच लोकसेवक वाडेकर त्या ठिकाणी हजर होते. तेथे

वाडेकर यांची भेट घेतली त्यावेळी मी वाडेकर यांना चहा नाष्टा करण्यासाठी हॉटेलमध्ये येण्याची विनंती केली. परंतु लोकसेवक वाडेकर हे हॉटेलमध्ये आत जात असताना दक्षतेच्या दृष्टीने आजुबाजुस पाहुन आमचेसह आत आले. सदर हॉटेलमध्ये आंम्ही सर्वांनी चहा घेतला. सदर वेळी लोकसेवक वाडेकर हे त्यांनी केलेल्या मीटर बोर्डाच्या कामाचे खुशीने पैसे देण्यास सांगितले. त्यावेळी मी माझ्याकडील पॅन्टच्या उजव्या खिशातील लाच रक्कम रु ८,०००/- उजव्या हाताने काढुन लोकसेवक वाडेकर यांना दिली त्यावेळी त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून ती रक्कम हॉटेलच्या टेबलावर ठेवली. त्यावेळी पंचानी नेमुन दिलेला इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने लोकसेवक वाडेकर यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले व लाच रक्कम रु ८०००/- पंचासमक्ष लोकसेवक वाडेकर यांचेकडून हस्तगत केली.

लोकसेवक वाडेकर यांनी लाच घेतलेले रामनाथ स्नॅक्स (हॉटेल कामत) हे सार्वजनिक ठिकाण कुलाबा पोलीस ठाण्यापासुन जवळच असल्याने पुढील कामकाजासाठी सर्वजण कुलाबा पोलीस ठाणे येथे लोकसेवकासह आलो. त्यादरम्यान मी माझा उजव्या हाताचा स्पर्श कोणत्याही वस्तुस केला नाही. कुलाबा पोलीस ठाणे येथे आल्यानंतर माझे हातांची, कपडयांची अंधारात अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता, माझे उजव्या हातावर व पॅन्टच्या उजव्या खिशाच्या तोंडास व आतील बाजूस ठिकठिकाणी अॅन्थ्रसिन पावडरची हिरवट चकाकी दिसून आली. त्यानंतर माझे कामासंबंधीची कागदपत्रे हे पो.नि.ठेंगले व पंचानी पाहिले व सदर कागदपत्रांच्या झेरॉक्स काढून त्या प्रती पो.नि.ठेंगले यांनी पुढील कामकाजासाठी ताब्यात घेतल्या.

वरील नमुद घटनेमध्ये लोकसेवक वाडेकर यांचे विरूध्द मी दिनांक १३/०८/२०१८ रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवरून लोकसेवक वाडेकर यांनी मी केलेल्या कामाच्या मोबदल्यात रू.८,०००/-लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडुन सापळा कारवाई पुर्ण करण्यात आली आहे.

तरी लोकसेवक समीर मधुकर वाडेकर, वय ४४ वर्षे, धंदा - नोकरी (प्रभारी अभियंता), इलेक्ट्रिक हाऊस, ग्राहक सेवा केंद्र, 'अे' वॉर्ड, कुलाबा, मुंबई यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

मी पो.नि.ठेंगले यांनी माझी वरील फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मला हिंदीतुन समजावुन सांगितली. सदरची फिर्याद पो.ना.क्र.३१०८७ यांना संगणकावर टंकलिखित केली असुन त्याची प्रत काढल्यानंतर त्यावर मी सही केली आहे.

समक्ष
[signature] 14/8/18

(आर.टी. ठेंगले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

[signature]
14/8/2018
[thumb impression]

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........

Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मा.मत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforn) write down details on blank back page.

रु. ८०००/-

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) रु. ८०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, i' required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना मिळालेले ६५ इलेक्ट्रिक मीटरचे बोर्ड व वायरिंगचे कामाचे संदर्भात आरोपी लोकसेवक प्रभारी अभियंता समीर मधुकर वाडेकर यांनी कायदेशीर पारिश्रमिकाव्यतिरिक्त फिर्यादी यांचेकडून प्रत्येक मीटरचे रु. ३५०/- प्रमाणे रुपये २२७५०/- लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रुपये ८०००/- ची लाच स्विकारली म्हणून भ्र.प्र. अधिनियम (सुधारित) २०१८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ........ आर.टी. ठोंबरे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ........

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P. S. ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याच त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14/12/2018

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name ... (आर.टी. ठोंबरे)
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Coding No. of I. O. ........

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**